# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्धीपत्रक

- **मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मुसळधार पावसाच्या पाश्वभूमीवर एकूण ७६ संक्शन पंप कार्यरत -- नागरिकांना सतर्क रहाण्याचा इशारा!**

मुंबईसह उपनगरांमध्ये सोमवारी दि. दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या मुसळधार पावसाचा मोठा फटका बसला असून, मिरा भाईंदर शहरातही पावसाने जोरदार हजेरी लावली. मात्र, पावसाच्या संभाव्य आपत्तीजन्य परिणामांना सामोरे जाण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका पूर्णतः सज्ज आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, प्रभाग अधिकारी, स्वच्छता निरीक्षक. अग्निशमन दलाचे अधिकारी तसेच इतर मनपा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या वतीने शहरातील विविध भागांमध्ये प्रत्यक्ष पाहणी करत उपाययोजना केल्या जात आहेत.

सकल भागात साचलेल्या जलनियंत्रणासाठी ठोस पावले उचलली जात आहेत. तसेच प्रभाग १ व २ – बेकरी गल्ली, गांधी नगर, नाकोडा हॉस्पिटल, राई ,शिवनेरी व मोर्वा परिसरात २२ सक्शन पंप कार्यरत आहेत. प्रभाग ३ व ४ – जागृती अपार्टमेंट, लक्ष्मीनगर, खारीगाव, महेश इंडस्ट्रियल इस्टेट, रामदेव पार्क, लक्ष्मी पार्क, रेणुका अपार्टमेंट, गौरव संकल्प, भैरव रेसिडन्सी, हटकेश या भागांत पाणी उपसासाठी २३ सक्शन पंप कार्यरत आहेत. प्रभाग ५ – कानुंगो इस्टेट, शांतीनगर सेक्टर(३/४/५), पूनमसागर, स्मशानभूमी, शीतल नगर येथे १६ सक्शन पंप कार्यरत आहेत व प्रभाग ६ –कृष्णस्थळ, रामनगर, मुळशी कंपाऊंड या ठिकाणी १५ सक्शन पंप कार्यरत आहेत. मिरा भाईंदर शहरात मनपा प्रशासनाने एकूण ७६ ठिकाणी साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी सक्शन पंप बसविले आहेत.

आपत्ती व्यवस्थापन पथक सुध्दा तत्परतेने कार्यरत आहे. पालखाडी तलावाजवळ एका झाडाच्या पडण्याची माहिती मिळताच महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. झाडामुळे रस्ता बंद झालेला असताना, पेट्रोल सॉकटरच्या सहाय्याने झाडाच्या फांद्या कापून हटवण्यात आल्या. तसेच जेसीबी मागवून रस्ता मोकळा करण्यात आला. शहरवासीयांची सुरक्षा हीच महानगरपालिकेची सर्वोच्च प्राथमिकता आहे. हवामानाच्या बदलत्या स्थितीचा सतत मागोवा घेत शहरात कोणतीही आपत्ती निर्माण होऊ नये यासाठी प्रशासन सतत कार्यरत आहे.

दि. १८ ऑगस्ट आणि १९ ऑगस्ट २०२५ रोजी भारतीय हवामान खात्याने ठाणे जिल्हा व मिरा-भाईंदर परिसरासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. पुढील दोन दिवस अतिवृष्टीची शक्यता असल्यामुळे ,आवश्यक नसल्यास घराबाहेर पडू नका. नाले, समुद्रकिनारे व पाणी साचलेल्या भागांपासून दूर राहा. प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करा. तात्काळ मदतीसाठी महानगरपालिकेशी संपर्क साधा.मिरा भाईंदर महानगरपालिकेचा आपत्ती व्यवस्थापन कक्ष 24x7 कार्यान्वित असून सुरक्षितेच्या दृष्टीने शहरात सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत.आपत्कालीन संपर्क क्रमांक - ०२२-२८११७१०२ / ०२२-२८११७१०४ / १८००२२४८४. भ्रमणध्नी क्रमांक -८२९१३७०१३८ / ८६५७०४७४०२. तसेच मिरा भाईंदर शहरातील नागरिकांनी सतर्क आणि सुरक्षित रहावे असे आवाहन . मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांसकडून करण्यात येत आहे.